जा.क्र.प्राफसंके/काजू/ 300 /2020
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग
दिनांक : 22 JAN 2020

प्रति,

........................................................

........................................................

........................................................

**विषय :– "राष्ट्रीय स्तरावरील काजू प्रशिक्षण वर्ग"** कार्यक्रमा दरम्यान देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थ/अल्पोपहार पुरविण्याबाबत.....

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे माहे फेब्रुवारी, 2020 मध्ये चार दिवसीय **"राष्ट्रीय स्तरावरील काजू प्रशिक्षण वर्ग"** आयोजित करण्यात येणार असून सदर वेगवेगळया प्रशिक्षणास साधारणतः 50 प्रशिक्षणार्थी उपस्थित राहणार असून सदर उपस्थितांना प्रशिक्षणादरम्यान खाद्यपदार्थ/अल्पोपहार दयावयाचे नियोजित असून आपणांस विनंती करण्यात येते की, खालील तपशिलाप्रमाणे खाद्यपदार्थ व अल्पोपहार आपण पुरवू इच्छित असल्यास कृपया त्याबाबतचे दरपत्रक खालील नमुन्यात दिनांक **06.02.2020** पूर्वी कार्यालयास सादर करावेत.लिफाफ्यावर **"राष्ट्रीय स्तरावरील काजू प्रशिक्षण वर्ग"** कार्यक्रमा दरम्यान देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थ/अल्पोपहार **दरपत्रक (काजू प्रक्षेत्र)** असा उल्लेख असावा.

| अ.क्र. | तपशिल | दर रु. |
|---|---|---|
| 1 | चहा, कॉफी नाश्ता (इडली, मेदूवडा, कांदा पोहे, ब्रेड ऑम्लेट, उपीट, बटाटावडा – सांभार, डोसा, शिरा, व इत्यादी) | |
| 2 | चहा व बिस्किट | |
| 3 | जेवण शाकाहारी ( मिक्स व्हेज, ऊसळ, पालेभाजी, सुकी भाजी, चपाती, पुरी, राईस, वरण, पुलाव, गुलाबजाम, आईस्क्रीम बासुंदी, शेवया खिर, सोलकढी, दही कोशिंबीर, लोणचे, पापड व इत्यादी ) | |
| 4 | जेवण मांसाहारी (मच्छी फ्राय, चिकन मसाला व करी, चपाती, राईस, सोलकढी, दही कोशिंबीर, सॅलड) | |

वरील सर्व खाद्यपदार्थ कार्यक्रमाच्या ठिकाणी देण्यात यावे.

**अटी व शर्ती :**

1. दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा.
2. दरपत्रकावर चहा, नाश्ता व जेवण पुरविण्याबाबतच्या पत्राचा अंतिम तारखेचा व काजू प्रक्षेत्र असा उल्लेख असावा तसेच या कार्यालयाच्या प्राप्त दरपत्रकाचा संदर्भ देण्यात यावा.
3. सिलबंद दरपत्रक अंतिम तारखेनंतर या कार्यालयात पोहोच झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
4. दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारणे बाबत अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
5. चहा, नाश्ता, जेवण व पिण्याचे पाणी कार्यक्रम ठिकाणी पोहोच असावेत तसेच जेवणाकरीता ताट, वाटया, ग्लास इ. साहित्य पुरविण्यात येऊन जेवण वाढण्याची व्यवस्था आपणातर्फे करण्यात यावी.
6. दरपत्रकधारकाने त्याचा **GST/VAT/CST** क्रमांक द्यावा. तथापि **GST/VAT/CST** क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या दरपत्रक धारकाच्या लेटर हेडवर दरपत्रक देण्यात यावे.
7. दरपत्रक धारकाने पॅनकार्डची छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक राहील.

कळावे,

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
ता. वेंगुर्ला जि. सिंधुदुर्ग